# प्रकरण - दुसरे

---

# सर्वोदय विचार : उदय व विकास

# प्रकरण - दूसरे

## सर्वोदय विचार : उदय व विकास

मोहनदास करमचंद गांधी दक्षिण आफ्रिकेत असताना आपल्या देशबांधवांना ब्रिटिश सरकारकडून जी अपमानकारक, अमानुष वागणूक मिळत होती. ती पाहून ते अस्वस्थ झाले आणि त्या अन्यायाच्या प्रतिकाराचा विचार करत असताना त्या परिस्थितीला तोंड देण्याचा नवीन मार्ग त्यांना सुचला. तो म्हणजे 'सत्याग्रह' होय. भारतीय जनतेला या परकीय गुलामगिरीच्या जोखडातून सोडविण्याचा 'सत्याग्रह' एक अभिनव मार्ग होता. भारताच्या स्वातंत्र्यासाठी संघटित केलेल्या अनेक राष्ट्रव्यापी चळवळी मधून गांधींनी सत्याग्रहाचे नवे तत्त्व विकसित केले. ब्रिटीश सत्तेने लादलेल्या गुलामगिरीशी दोन हात करण्याचा प्रयत्न त्यांनी सत्याग्रहाद्वारे केला. याच सत्याग्रहाच्या साहाय्याने स्वराज्य स्थापन करणे हे गांधीचे उद्दिष्ट होते. गांधी दक्षिण आफ्रिकेतील वर्णभेदी गोऱ्या सरकारच्या विरोधात लढा देत असले तरी भारतात चाललेल्या स्वातंत्र्य चळवळीबद्दल त्यांना पक्के आकलन होते. त्यांनीच विकसित केलेल्या सत्याग्रहाच्या मार्गाचा भारतातही अवलंब करता येईल व त्याद्वारे आपल्या स्वराज्याची प्राप्ती होईल अशी त्यांची खात्री होती. भारतीय स्वराज्य कसे असेल याबद्दलचे चिंतनही गांधी करत होते. १९०९ साली लिहिलेल्या 'हिंद स्वराज्य' या पुस्तकातून त्यांनी भारतीय स्वराज्याची मांडणी केली आहे. स्वराज्याचे अंतिम ध्येय काय असावे. त्याचे चिंतन करताना गांधींनी 'सर्वोदय' संकल्पनेला जन्म दिला आहे. त्यांनी सर्वोदय हे स्वराज्याचे उद्दिष्ट आहे असे विशद केले. तेव्हा सर्वोदय संकल्पनेचा अभ्यास करणे गरजेचे आहे. त्यासाठी सर्वप्रथम सर्वोदय संकल्पना समजून घेवू.

### सर्वोदयाचा अर्थ :

सर्वांचा उदय म्हणजे 'सर्वोदय' असा सर्वोदयाचा लहान अर्थ निघत असला तरी सर्वोदयाची व्याप्ती मात्र खूप मोठी आहे. "सर्व भुत - हिताय" (मो. क. गांधी (१९५५) ४). असा गांधींनी सर्वोदयाचा अर्थ स्पष्ट केला आहे. यामधील 'सर्व' या

शब्दात केवळ मानव जातीचा समावेश केलेला नाही. तर पृथ्वीतलावर अस्तित्त्वात असणाऱ्या संपूर्ण सजीवसृष्टीतील ज्या प्राणीमात्रांचा समावेश मानवाने आपल्या कुटुंबात केला आहे. त्यांचा समावेश 'सर्व' या शब्दात केला आहे. यासर्व मानव प्राण्यांचा उदय म्हणजे 'सर्वोदय' होय.

'सर्वोदय' ही व्यापक संकल्पना आहे. त्यामध्ये सर्वांच्या कल्याणाचा सर्वव्यापक असा विचार मांडला आहे. कोणत्याही एकाच्या उदयावर सर्वोदयाने भर दिलेला नाही. तर सर्वांच्या उदयाचा विचार सर्वोदयात येतो. त्यामुळे सर्वोदयास सर्वव्यापक स्वरूप प्राप्त झाले आहे. सर्वोदयात कोणत्याही एका वर्गाच्या समूहाच्या किंवा व्यक्तीच्या उदयाची कल्पना मांडण्यात आलेली नाही. तर संपूर्ण मानव जातीच्या उदयाचा विचार सर्वोदयात केला आहे. सर्वोदय समाजास वरिष्ठ-कनिष्ठ, सबल-दुर्बल, बुद्धिमान-मंदबुद्धी, लहान-मोठे आणि समाजात अस्तित्त्वात असणारे इतर सर्व घटक यांच्या उदयाने सर्वोदयास समाधान प्राप्त होते म्हणून सर्वांच्या उदयाचा समावेश सर्वोदयात केलेला आहे. प्रत्येकाने इतरांच्या सुख-दुःखात सहभागी झाले पाहिजे. दुसऱ्याचे सुख-दुःख हे आपले सुख-दुःख आहे. अशी भावना प्रत्येक व्यक्तीच्या मनात वाढीस लागली पाहिजे. याबद्दल विनोबा भावे म्हणतात, "प्रत्येकाने एकमेकांबद्दल चिंता वाहावी आणि आपली चिंता दुसऱ्याला त्रास देणार नाही अशा रितीने वाहावी." (विनोबा भावे (१९८९)२५). अशी वृत्ती समाजात निर्माण झाली पाहिजे. समाजात राहणारी प्रत्येक व्यक्ती ही समाजाचा घटक असते. तेव्हा समाजाचा घटक या नात्याने परस्परांची काळजी घेतली पाहिजे. आपल्यामुळे दुसऱ्या कोणालाही कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची दक्षता प्रत्येकाने घेणे गरजेचे आहे. त्यामुळे समाजात परस्पर स्नेह, प्रेम व सहकार्याची भावना वाढीस लागेल. आणि समाज सर्वकल्याणकारी स्वरूप धारण करेल. पाश्चात्त्य विचारवंतांनी मानवी स्वभावाचे वर्णन हे निसर्गतः क्रुर, निर्दयी, स्वार्थी असे केले आहे. तर याच्या उलट सर्वोदयाने माणूस हा मूलतः व स्वभावतः निःस्वार्थी, सदाचारी प्राणी आहे. तसेच सहकारी, परोपकारी व शांतताप्रेमी आहे. अशी मानवी स्वभावाची गृहित प्रेरणा धरली आहे. मानवाच्या प्रेम, दया, करूणा, शांतता, निःस्वार्थीपणा, सामंजस्य

यासारख्या सद्गुणांना सर्वोदयाच्या माध्यमातून उजाळा देता येईल असा विश्वास सर्वोदय तत्त्वज्ञानाच्या मुळाशी आहे हे स्पष्ट होते.

'अधिकात अधिक लोकांचे अधिकात अधिक सुख' ही पाश्चात्त्य उपयुक्ततावादाची संकल्पना बेंन्थामनी मांडली. यामध्ये समाजातील लोकांना जास्तीत-जास्त सुख देण्याचे तत्त्व मांडले आहे. उपयुक्ततावादात जास्तीत-जास्त सुखाचा विचार केल्याने सर्वांचा उदय होणे शक्य नव्हते. समाजाच्या उदयासाठी अधिकात-अधिकांचे सुख नव्हे तर सर्वांचे सुख आवश्यक आहे. सर्वोदयाच्या उदयाच्या प्रक्रियेतून समाज हा सर्वांगीण विकासाच्या मार्गाने प्रवास करत असतो. म्हणूनच पाश्चात्त्य तत्त्वज्ञानावर आधारित उपयुक्ततावादाची संकल्पना मो. क. गांधीं यांनी मान्य नव्हती. उपयुक्ततावादातील विषमता, संघर्ष, भेदभाव, केंद्रीकरण या मूल्यांवर गांधींनी टिका केली आहे. उपयुक्ततावादापेक्षा भिन्न असे सर्वांच्या कल्याणाचे सर्वोदयाचे तत्त्वज्ञान त्यानी मांडले. तेव्हा सर्वोदय विचार मांडणी मागे कोणती भूमिका आहे हे समजून घेणे गरजेचे आहे.

**सर्वोदयाची भूमिका :**

आजच्या समाज व्यवस्थेत अस्तित्त्वात असणारी अतिकेंद्रित राज्यव्यवस्था प्रचंड, प्रमाणात वाढत चाललेले औद्योगीकरण, यांत्रिकीकरण, राष्ट्रीय नियोजनाला प्राधान्य आणि अतिसंघटित असणारी पक्षरचना यांच्यावर सर्वोदय विचाराने प्रखर टिका केली आहे. समाजात या घटकांना असणारे स्थान मुळापासून उखडून काढले पाहिजे. त्यासाठी स्वयंपूर्ण स्वयंशासित, स्वायत्त आणि एकसंघ अशी समाजरचना प्रथम निर्माण करणे गरजेचे आहे. त्या समाजात कोणत्याही प्रकारची स्पर्धा, विषमता, संघर्ष, शोषण, हिंसा यांना स्थान असणार नाही. सामाजात कसलाही भेदभाव न ठेवता प्रत्येकाला समान वागणूक मिळाली पाहिजे. असे समानतेचे तत्त्व मान्य करणारी नवसमाज रचना निर्माण करण्याची भूमिका सर्वोदय विचारामागे होती. ही भूमिका प्रत्येकाने मान्य केल्यास समाजात असणारा भेदभाव, विषमता पूर्णपणे नष्ट होईल आणि त्यातूनच समानतेचा सर्वकल्याणकारी समाज निर्माण होईल असे वाटते.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

सर्वोदय समाजात वरिष्ठांपासून ते कनिष्ठांपर्यंतच्या लोकांची कल्याणकारी भूमिका मांडण्यात आली आहे. त्यामुळे प्रत्येकाने आपली संपत्ती ही लोकसंग्रहासाठी आणि लोककल्याणासाठी उपयोगात आणली पाहिजे. सर्वोदय समाजात श्रमप्रतिष्ठेला प्राधान्य आहे. तेव्हा प्रत्येकाने आपल्या श्रमाद्वारे काहीतरी उत्पन्न केल्यास स्वयंपूर्ण असा सर्वोदय समाज निर्माण होईल आणि त्यातून सर्वांचे कल्याण साधने शक्य होईल अशी सर्वोदयाची भूमिका आहे. या भूमिकेतूनच सर्वोदयाने सर्वांचा उदय करण्याचा प्रयत्न केला आहे.

**सर्वोदयाचा उदय :**

सर्वोदयाचा उदय गांधींच्या 'अंत्योदया'च्या संकल्पनेतून झालेला आहे. असे असले तरी सर्वोदयाचे मुळ हे प्राचीन साहित्यात म्हणजे प्राचीन ग्रंथामध्ये आढळते. आचार्य सामंतभद्र या जैन मूनीच्या लेखनातून मो. क. गांधी यांनी 'सर्वोदय' हा शब्द उच्चारला होता. "सर्वेनः सुखीन संतु" (विनोबा भावे (१९८९)७८). या ऋषीच्या लिखानातील वाक्यावरून सर्वोदयाची संकल्पना प्राचीन काळात अस्तित्वात होते असे दिसते. परंतु सर्वोदयाचा विचार हा प्रत्यक्ष व्यवहारात वापरलेला दिसून येत नाही.

गांधी दक्षिण आफ्रिकेत असताना त्यांच्यावर जॉन रस्कीन, टॉलस्टॉय, थोरो या पाश्चात्त्य विचारवंतांच्या विचारवैभवाचा प्रभाव पडला. ते दक्षिण आफ्रिकेत असताना जोहान्सबर्गहून डरबनला जात होते. तेव्हा जोहान्सबर्ग स्टेशनवर त्यांच्या पोलाक या इंग्रज मित्राने प्रवासात वाचण्यासाठी एक पुस्तक दिले. त्यांनी ते पुस्तक घेतले. ते पुस्तक म्हणजे थोर पाश्चात्त्य विचारवंत रस्कीन यांचे Unto this Last हे होय. जोहान्सबर्ग ते डरबन या चोविस तासाच्या प्रवासात गांधींनी ते पुर्ण पुस्तक वाचले. Unto this Last या पुस्तकाची पार्श्वभूमी बायबल ग्रंथामधील आहे.

बायबल या धर्मग्रंथात अंत्याच्या उदयासंबंधी एक उदाहरण दिले आहे. ते म्हणजे एका द्राक्षाच्या बागेतील कामासाठी काही मजूर एक पेनी मजूरी करारावर त्या बाग मालकाने कामास ठेवले होते. दुपारच्या वेळेस काही बेकार मजुर बागेच्या आसपास

फिरताना त्या बागमालकास दिसले. तेव्हा त्या मालकाने त्यांनाही बागेत कामास लावले. त्यानंतर काही वेळाने परत मालकाने आणखी बेकार मजूरांना फिरताना पाहिले. त्यांनाही कामास लावले. काम संपल्यावर बागमालकाने मुनीमजीना सर्वांना समान एक-एक पेनी मजूरी देण्यास सांगितले. आणि जे उशिरा आलेले होते त्यांना अगोदर मजुरी देण्यास सांगितले. मजुरी देण्याच्या या पद्धतीत मानवता आणि समानता हे अद्वैत तत्त्व समाविष्ट करण्यात आले होते. याच तत्त्वावर आधारित Unto this Last पुस्तक रस्कीन ने लिहिले आहे. Unto this Last मध्ये सर्वप्रथम अंत्याच्या उदयाचा विचार मांडला आहे.

या पुस्तकाच्या प्रभावातून गांधींनी त्याचा गुजराथी भाषेत अनुवाद केला. व त्यास 'अंत्योदय' असे नाव दिले. यामध्ये समाजातील कनिष्ठ वर्गाच्या उदयाचा विचार मांडला आहे. याबद्दल गांधी म्हणतात, "संपूर्ण जगाचा उदय जेव्हा होईल तेव्हा होईल परंतु भंगी समाजाचा उदय होणे गरजेचे आहे." (गांधी मो. क. (१९५५)२). म्हणून त्यांनी अंत्यांना सोडून इतर वर्गाचा उदय झाला आहे असे ग्राह्य मानले होते. परंतु परिस्थिती अंत्योदयाच्या विचाराप्रमाणे नव्हती. तेव्हा सर्वांचा उदय झाला पाहिजे या विचाराला प्राधान्य देवून अंत्योदयातून सर्वोदयाचा जन्म झाला आहे. मो. क. गांधींनी अभिप्रेत असणारी सर्वोदय समाजाची रचना त्यांच्या हयातीमध्ये समाजात रूजू शकली नाही. म्हणून सर्वोदयाच्या विचारांचा विकास करण्यासाठी उत्तरगांधीवादी कार्यकर्त्यांनी प्रयत्न केले आहेत. तरीही गांधींचा मुळचा सर्वोदयाचा दृष्टिकोन अभ्यासणे गरजेचे आहे.

**गांधींच्या दृष्टितील सर्वोदय विचार :**

गांधींना बॅरिस्टरची पदवी मिळाल्यानंतर त्यांनी भारतात काहीकाळ वकीली केली. पोरबंदरच्या एका मारवाड्याचा खटला चालवण्यासाठी परत द. आफ्रिकेला जाण्याची संधी त्यांना मिळाली. द. आफ्रिकेतील वास्तव्यात असताना तेथील समाजरचना गांधींनी अगदी जवळून पाहिली होती. त्या समाजरचनेत असणारी विषमता, नीतीभेद यांनी अगदी कळस केला होता. तेथील भारतीयांना दिलेली तुच्छतेची, हिनतेची वागणूक अन्याय, जुलूम, काळा-गोरा भेदभाव यामुळे प्रत्येक समाजरचनेत विषमतेची मोठी दरी निर्माण झाली होती. या सर्व परिस्थिती संबंधी गांधींचे मन उदिग्न झाले होते. समाज व्यवस्थेतील

विषमता नष्ट करून सर्वांना समानतेची वागणूक मिळवून देण्यासाठी त्यांनी सत्याग्रहाची संकल्पना मांडली. हिंदी जनतेला न्यायाची वागणूक मिळवून देण्यासाठी सत्याचे प्रयोग म्हणून सत्याग्रहाचा आरंभ प्रथमतः गांधींनी केला.

गांधींच्या अंत्योदयाच्या संकल्पनेतून सर्व वर्गाच्या उदयाच्या, कल्याणाच्या हेतूने सर्वोदयाची निर्मिती झाली. या अंत्योदयाच्या विचारांना अनुसरून सर्वोदयाचा सिद्धांत यांनी पुढीलप्रमाणे सांगितला आहे.

"१) सर्वांच्या कल्याणात आपले कल्याण आहे.

२) वकील काय किंवा न्हावी काय दोघांच्याही कामाची किंमत सारखीच असली पाहिजे. कारण पोटापाण्याचा हक्क दोघांनाही सारखाच आहे.

३) साधे अंगमेहनतीचे शेतकऱ्याचे जीवन हेच खरे जीवन होय." (गांधी मो. क. (२००८)२८४).

या सिद्धांतानुसार सर्वांच्या विकासाचा दृष्टिकोन मांडला आहे. समाजाच्या कल्याणासाठी प्रत्येकाने इतरांच्या सुख-दुःखाचा विचार केला पाहिजे. दुसऱ्याच्या सुखात स्वतःच्या सुखाचा आनंद घेतला पाहिजे. ही भावना समाजात वाढीस लागणे गरजेचे आहे. प्रत्येकाला उदरनिर्वाहाचा समान अधिकार असल्याने कोणालाही त्याच्या कामाच्या स्तरानुसार उच्च-नीचतेची वागणूक दिली जावू नये. तेव्हा प्रत्येकाला समानतेची वागणूक देणे आवश्यक आहे. शेतकऱ्याचे किंवा जो अंगमेहनतीचे काम करून जीवन जगत असतो. त्याचेच वास्तविक खरे जीवन असते. असा सर्वोदय सिद्धांताचा विचार आहे. या विचारानुसारच संपूर्ण समाजात समानता निर्माण झाली पाहिजे. असा मो. क. गांधींचा विचार होता.

समाजात कोणत्या ना कोणत्या स्वरूपात म्हणजे प्रकट किंवा अप्रकट अशा स्वरूपात हिंसा ही अस्तित्त्वात असते. लढाई-युद्धे, दंगा, मारामारी ही हिंसेची प्रकट रूपे आहेत. तर संग्रह चोरी, गुलामगिरी, शोषण, बेइमानी, भ्रष्टाचार, राग, व्देष ही हिंसेची अप्रकट रूपे आहेत. त्यांचा वापर समाजात प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष होत असतो. तेव्हा या

हिंसेपासून लांब असणाऱ्या अहिंसक समाजाची निर्मिती गांधींना करायची होती. वाढत्या हिंसाचाराला आळा घालून अहिंसेवर आधारित सर्वोदय समाजाची रचना करायची होती. श्रमनिष्ठा, स्वावलंबन, स्वदेशी, स्वायत्त, ज्ञान, यज्ञ, दान, तप, सहकार्य व स्थानिक स्वराज्य या मार्गाचा वापर केल्यास हिंसा नष्ट होवू शकते. आणि सर्वोदय समाज निर्माण होवू शकतो असे गांधींना वाटते. या विवेचनावरून त्यांनी सर्वोदयाचे दोन सिद्धांत सांगितले आहेत ते पुढीलप्रमाणे-

"१) अनितीमय अहिंसक क्रांतीच्या मार्गाने स्वराज्य मिळू शकत नाही.

२) स्वराज्य मिळाल्यावर अनितीमय मार्गाने विकास होवू शकत नाही" (अग्रवाल गंगाप्रसाद (२००८)२३). गांधींना स्वातंत्र्य प्राप्तीसाठी अहिंसक मार्ग योग्य वाटत होता. त्यामुळे शांततामय अहिंसक मार्गाने मिळालेले स्वातंत्र्य त्यांना अभिप्रेत होते. अनिती आणि अहिंसक मार्गाचा वापर करून मिळालेले स्वातंत्र्य फार काळ टिकू शकणार नाही. तसेच अशा स्वातंत्र्यात जनतेचा विकास होणार नाही. असे गांधीना वाटत होते. 'जगा व जगु द्या' या तत्त्वापेक्षा इतरांसाठी जगा' या उच्च तत्त्वज्ञानाचा समावेश सर्वोदयात केला आहे. मानव हा मुळात सद्वर्तनी, त्यागी, शांतताप्रेमी आणि दुसऱ्यावर उपकार करण्यात तत्पर अशा वृत्तीचा आहे. मात्र सामाजिक परिस्थितीमुळे हे गुण लुप्त होतात ही परिस्थिती बदलली पाहिजे तेव्हा सर्वोदय समाज अस्तित्त्वात येईल.

गांधींनी श्रमनिष्ठा मानणारी स्वयंशासित, स्वातंत्र्य, स्वायत्त समाजाची कल्पना सर्वोदयात मांडली आहे. त्यासाठी प्रत्येकाने आपल्या गरजा कमीत-कमी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे, यंत्राचा कमीत-कमी वापर करणे आणि जे मोठे अवजड उद्योग आहेत त्यावर सामाजाच्या सामूहिक मालकीद्वारे नियंत्रण प्रस्थापित केले पाहिजे. अशा स्वावलंबी समाजात लहान-लहान उद्योग निर्माण करून आपल्या गरजा याद्वारे भागविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. गरजांच्या पूर्ततेसाठी आवश्यक अशा उत्पादन घटकांची निर्मिती केल्याने समाज स्वयंपूर्णतेच्या पायावर उभा राहील. समाजात असणारी सर्व साधन संपत्ती, सामर्थ्य हे लोकांच्या कल्याणासाठी वापरल्यास स्वयंपूर्ण आणि



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

स्वावलंबी असा सर्वोदय समाज निर्माण होवू शकतो, असा गांधींना विश्वास वाटत होता. सहकार, लोकशाही, सत्तेचे विकेंद्रीकरण व ग्रामीण लोकांचे हितसंवर्धन करणे या घटकांना सर्वोदयात महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे. त्यातून गांधींना मानवी विकासास पोषक अशी सर्वोदय समाज रचना निर्माण करायची आहे. त्यांना सर्वोदयाच्या माध्यमातून संपूर्ण मानवजातीच्या कल्याणाचे स्वप्न साकार करायचे होते. परंतु सर्वोदय समाजाचे गांधीचे असलेले स्वप्न प्रत्यक्षात उतरले नाही. म्हणून उत्तर गांधीयवाद्यांनी सर्वोदयाच्या विचारांना चालना देण्याचे काम केले.

गांधींच्या मृत्यूनंतर १९४८ मध्ये गांधींच्या अनुयायांनी सेवाग्रामला एक सभा घेण्याचे ठरविले. या सेवाग्रामच्या सभेत मो. क. गांधीच्या विचारावर चर्चा करून ते विचार प्रत्यक्षात व्यवहारात उतरविण्याचा विचार केला. यामध्ये सर्वोदय समाजाच्या रचनेला अधिक महत्त्व दिले. विधायक कार्य करणाऱ्या अनेक संस्थांच्या कामामध्ये एकसुत्रीपणा आणण्याच्या हेतूने आणि सर्व संस्था व कार्यकर्त्यांना सर्वोदयाच्या अधिष्ठानावर आप-आपले कार्य सार्थ करावयाच्या दृष्टिने 'सर्वसेवा संघा'ची स्थापना केली. त्यातूनच सर्वोदय समाजाची निर्मिती झाली. सर्वोदयाचे तत्त्वज्ञान जाणून घेण्यासाठी गांधीवादी कार्यकर्त्यांनी सर्वोदयाच्या प्रचारासाठी प्रचारकाची भूमिका बजावली होती. या कार्यकर्त्यांच्या विचारातून गांधींनी मांडलेल्या सर्वोदयाच्या संकल्पनेला एक नवी वैचारिक चौकट मिळाली. हा सर्वोदयाचा विचार समाजापर्यंत पोहचविण्यासाठी विनोबा भावे, दादा धर्माधिकारी, जयप्रकाश नारायण, धिरेंद्र मुजुमदार आणि इतर गांधीवादी कार्यकर्त्यांनी प्रयत्न केले. यामध्ये सर्वात मौलिक भर घातली ती विनोबा भावेंनी असेच म्हणावे लागले. त्यांच्या कार्याचा आढावा पुढील मुद्दयाआधारे घेता येईल.

**विनोबा भावे यांच्या दृष्टितील सर्वोदय विचार :**

मो. क. गांधी आणि विनोबा भावे यांची पहिली भेट ही हिंदू विश्वविद्यालयाच्या एका समारंभाच्या वेळी झाली. त्यावेळी गांधींनी केलेल्या भाषणाने विनोबा भावे प्रभावित झाले होते. त्यापासून विनोबा भावे गांधींकडे आकर्षित झाले. गांधींबरोबर आश्रमाच्या

जीवनाशी समरस झाले. आश्रमातील शरीरश्रमाच्या कामात ते उत्साहाने भाग घेत होते. त्यांच्या शिस्तबद्ध आचरणाला गांधी अगदी भारावून गेले. त्यानंतर गांधींच्या आज्ञेनुसार भावेनी वर्ध्याला आश्रमाची स्थापना केली. १९२३ च्या सत्याग्रहात सर्वप्रथम विनोबा भावेंनी सहभाग घेतला. त्यानंतर 'वायकोम सत्याग्रह', 'जंगल सत्याग्रह' तसेच गांधींच्या व्यक्तीगत सत्याग्रहात विनोबा भावेंनी सक्रिय सहभाग घेतला होता. म्हणून विनोबा हे पहिले वैयक्तिक सत्याग्रही झाले. १९४२ च्या 'चले जाव चळवळीसाठी' विनोबांचे मोलाचे योगदान होते. गांधींप्रमाणेच त्यांनी अहिंसेचा मार्ग स्विकारला होता. खेड्याच्या विकासासाठी प्रथम ग्रामोद्योगाची स्थापना केली होती. अचानक झालेल्या गांधींच्या मृत्यूमुळे त्यांची अनेक कार्ये अपूरी राहिली होती. तेव्हा त्या कार्याला पूर्णत्त्व प्राप्त करण्याच्या हेतूने गांधीवादी कार्यकर्त्यांनी एकत्र येवून सर्वोदय समाजाची आणि सर्वसेवा संघाची स्थापना केली. गांधींच्या अंत्योदयाच्या संकल्पनेस विनोबांनी सविस्तर स्वरूप देवून सर्वोदय समाजाची मांडणी केली. त्यांनी केवळ सर्वोदयाची मांडणी केली नाही, तर सर्वोदयाचे चिंतन, मनन करून त्यास रचनात्मक स्वरूप प्रदान केले.

सेवाग्राम येथील पहिल्या सर्वोदय सम्मेलनात विनोबांनी तीन भाषणे केली. तेव्हापासून सर्वोदयात विनोबांचे नाव कायम झाले. सर्वोदयाच्या कार्याच्या प्रक्रियेला येथूनच आरंभ झाला, असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. १९५१ च्या शिवरामपल्ली येथील सर्वोदय संम्मेलनात विनोबा भावे मुख्य नायक होते. तेव्हा ते म्हणाले, "जेथे अनुशासनाची गरज असेल तेथे सर्वोदय समाज अशी संस्था असावी" (चौसाळकर अशोक (२००३)५). ज्या समाजात कोणत्याही प्रकारच्या शासनाची गरज भासणार नाही. तेथे सर्वोदय समाज निर्माण होवू शकतो असा विनोबाचा विचार होता.

विनोबा भावेंना शासनमुक्त समाजाची स्थापना सर्वोदयाच्या माध्यमातून करायची होती. विनोबांच्या मते, "शासनमुक्त समाज स्थापन करणे हे आमचे ध्येय आहे. त्याकरिता हिमशक्तीच्या विरोधी दंडशक्तीहून भिन्न लोकशक्ती निर्माण करायची आहे." (भारदे बाळासाहेब (१९५७)२२). सर्वोदयास राज्यविहिन समाज निर्माण करायचा होता

हे सर्वोदयाने आपले ध्येय ठरविले होते. त्यासाठी वेगळे नियम उपक्रम तयार करून त्यांची अंमलबजावणी करण्याचे कार्य विनोबा भावे करत होते. पण नियमांच्या अंमलबजावणीसाठी कोणत्याही प्रकारे दंडशक्तीचा किंवा हिंसेचा वापर केला जाणार नाही. असे ठरविले होते. दंडशक्तीला जनतेची मान्यता नसते. त्यामुळे ती जास्तवेळ समाजात टिकून राहू शकत नाही. सर्वोदय समाजातही दंडशक्तीला स्थान नाही. लोकशक्ती ही जनतेची शक्ती असते. ती लोकांच्या सहकार्यातून निर्माण झालेली असल्याने लोकशक्तीला जनतेचा आधार असतो. जनशक्ती ही अहिंसेवर आधारित समाजात अस्तित्त्वात असते. दंडशक्ती ही हिंसेवर आधारित असल्याने कोणत्याही प्रसंगी प्रकट होते. म्हणून शासनमुक्त समाजाच्या स्थापनेसाठी दंडशक्तीपेक्षा वेगळी लोकशक्ती निर्माण करण्याचे उद्दिष्ट विनोबा भावेंचे होते. त्यांना विकेंद्रित असा असंग्रहित समाज आवश्यक आहे. तेथे सत्तेचे संपत्तीचे केंद्रीकरण असेल. काही प्रमाणात संग्रह ही असेल पण तो संग्रह कुणा एकाचा नसेल तर संपूर्ण समाजाचा असेल याबाबत विनोबा असे म्हणतात की, "असंग्रही समाजात विनोबा इतका मोठा संग्रह वाढवू इच्छितो. लोकांना त्याची कल्पना नाही. पण हा संग्रह वेग-वेगळ्या घरात वाढवू इच्छित नाही. तर तो प्रत्येक घरात वाटून देवू इच्छितो संग्रहाची समान वाटणी होईल. असंग्रह म्हणजे सर्वात मोठा पण वाटला गेलेला संग्रह. संग्रह खूप राहील पण तो घरात नाही समाजात राहील" (भावे विनोबा (१९८९)४). असा संपत्तीचा संग्रह समाजात झाला पाहिजे असे विनोबांचे मत आहे. कारण संग्रह विविध स्तरावर विभागल्याने त्यावर कोणाचीही मालकी निर्माण होणार नाही. भारत हा खेड्यांचा देश असल्याने खेडे हा आर्थिक कार्याचा महत्त्वाचा घटक माणून ग्रामपातळीपर्यंत सत्तेचे विकेंद्रीकरण होणे गरजेचे आहे.

सर्वोदय समाजात सत्ता लोप पावते. कारण सर्वांचा समाज असल्याने कोणाचेही कोणावर नियंत्रण अथवा वर्चस्व राहत नाही. विनोबा म्हणतात, "सर्वोदय समाज शिथिल अथवा अशिथिल नसून केवळ एक अरचना आहे. तो विचारांची सत्ता मान्य करणारा समाज आहे." (भावे विनोबा (१९८९)१०६). अशाप्रकारे सर्वोदय समाजात विचारांच्या

सत्तेशिवाय इतर कोणत्याच सत्तेला स्थान दिलेले नाही. याचप्रमाणे विनोबांच्या मते, "सर्वोदय समाज ही एक अ-संघटना वा सहज संघटना आहे." (भावे विनोबा (१९८९)३०). म्हणूनच त्यांनी सर्वोदयास संघ न म्हणता हेतूपरस्पर समाज म्हटले आहे. कारण संघापेक्षा समाज हा व्यापक असतो आणि सर्वोदय शब्दामुळे त्याची व्यापकता स्पष्ट होते. म्हणून संघाऐवजी सर्वोदय समाज हा शब्द वापरण्यात आला. विनोबांनी सर्वोदयाचा विचार आणि सर्वोदयाचे कार्य यात वेगळेपणा दर्शविला आहे. सर्वोदयाचा विचार आणि सर्वोदयाचा कर्मयोग असा भेद केला तर सर्वोदयाच्या रचनात्मक कार्यासाठी यंत्रासारखे कसून काम करणे गरजेचे आहे. सर्वोदयाचा विचार सहकार्यावर आधारित आहे. म्हणून विनोबा भावे म्हणतात, "सर्वोदय समाज हा सह-विचारी, सह-चिंतन, तत्त्व संकिर्तन आणि नाम जप यांचे साधन आहे." (चौसाळकर अशोक (२००३)७). यातूनच असे दिसते की, विनोबा भावेंच्या विचारकल्पनेतून आलेल्या सर्वोदय संकल्पनेस अमर्याद स्वरूप प्राप्त झाले.

सर्वोदय समाज हा विश्वव्यापक समाज आहे. सर्वोदय समाजात कोणास दाखल करून घ्यायचे याची स्पष्टता विनोबा भावेंनी केली आहे. त्यांचे असे मत आहे की, "सर्वोदय समाज हा प्रत्येक सेवकासाठी सर्व तंत्र स्वतंत्र समाज असेल जर कोणी व्यसनी, दारूडा असेल आणि तो मनापासून सर्वोदय समाजाचे कार्य करत असेल तर तोही सर्वोदय समाजाचा सेवक असू शकतो." (चौसाळकर अशोक (२००३)८). सर्वोदयामध्ये सेवकांसाठी कोणतीही नियमावली तयार करण्यात आलेली नाही. सर्वोदयाच्या विचारानुसार एखादी व्यक्ती सर्वोदय समाजाची सेवक होवू शकते. सर्वोदयात सेवक होण्यासाठी सभासदत्त्व स्वीकारावे, संम्मेलन, मेळावे यास हजर राहण्याचे बंधन नसते. तो आपल्या जागी राहून सर्वोदयाचे काम करू शकतो. जर एखादे लहान मूल दुसऱ्या कोणाची सेवा करत असेल तर ते देखील सर्वोदय समाजाचा सेवक बनू शकते. सर्वोदय सेवकाने स्वच्छ मोकळ्या मनाने सर्वोदयाचे काम करावे. सर्वोदय सेवक जी सेवा करेल ती एका लहान गावाची असावी. छोट्या कुटुंबाची असावी. एखाद्या

साधारण अशा व्यक्तीची, रोग्याची किंवा जशी जन्म देणाऱ्या मातेकडून मुलाची होते तशी सेवा सर्वोदयाच्या सेवकाने करावी. कारण त्या सेवेचा संबंध विश्वाच्या प्रतिनिधित्त्वाशी येतो. या भूमिकेतून सर्वोदय सेवकाकडून सेवा व्हायला पाहिजे. सर्वोदयाचे सर्व सेवक विश्वाचे सेवक म्हणून कार्य करतात. परमेश्वराची सेवा या वृत्तीने सेवकाने सेवा केली पाहिजे. सर्वोदयाच्या कार्याच्या निमित्ताने विनोबा भावे हैद्राबादकडे गेले होते. त्यातूनच विनोबांना भूक्रांती आणि ग्रामक्रांतीचा साक्षात्कार झाला आणि यातूनच भूदान यज्ञाने जन्म घेतला आहे. भावेंच्या भूदान यज्ञाचे विवेचन पुढे पाहू.

**अ ) भूदान यज्ञ :**

तेलंगणातील आर्थिक विषमता व हरिजनांची शोचनीय स्थिती पाहून विनोबा भावेंनी सर्वोदय विचाराच्या प्रसाराचे कार्य हाती घेतले. तेव्हा या भूमिकेतूनच हरिजन लोकांनी जमिनीच्या स्वरूपातील मदतीची याचना विनोबांकडे केली. या मदतीसाठी गावातील मोठ्या जमीनदारांना जमीन दान देण्याचे आवाहन विनोबांनी केले. १९५१ मध्ये रामचंद्र रेड्डी नावाच्या गृहस्थाने शंभर एकर जमीन दान म्हणून दिली. भूमीहिनांचा प्रश्न सोडविण्यासाठी विनोबांनी पदयात्रा सुरू केली. यालाच 'भूदान यज्ञ' असे नाव दिले. यातूनच भूदान यज्ञाच्या गंगोत्रीचा उगम झाला. या गंगोत्रीचा प्रसार करण्यासाठी प्रथम भावेंनी वेगवेगळया प्रदेशात पदयात्रा केली. प्रथम हिंसेने पीडलेल्या, रक्ताने न्हालेल्या तेलंगणातल्या घरोघरी फिरून भूदान यज्ञाचा संदेश सांगण्याचा प्रयत्न केला. विनोबा भावेंच्या भूदान यज्ञाचे विचार समाजापुढे आले तसे भूदान चळवळीचे कार्य अगदी जोमाने चालू झाले. विनोबा भावेंनी भूदान यज्ञाद्वारे दोन महिन्यातच बारा हजार एकर जमीन भूदानासठी मिळाली. भूदान चळवळीचा उद्देश फक्त जमीन मिळवून भूमीहीन लोकांना जमिनीचे वाटप करणे नसून समाजात सर्वोदयाची वृत्ती निर्माण करण्याचा हेतू होता. विनोबा भूदान यज्ञाचा उद्देश स्पष्ट करताना म्हणतात की, "जमिनीच्या ग्रामीणीकरणाच्या पायावर ग्रामोद्योगप्रधान अहिंसक समाजाची स्थापना करणे हा आहे." (भंडारी चारूदत्त (१९८९)२). या उद्देशाप्रमाणेच त्यांनी भूमीहिनांसाठी महत्त्वाचे कार्य

केले. ज्याप्रमाणे पृथ्वीतलावरील हवा, पाणी, प्रकाश याच्यावर सर्व लोकांचा अधिकार आहे. तसाच जमिनीवरही सर्वांचा अधिकार असावा. म्हणून प्रत्येक जमीन धारकाने आपल्या भूमीहीन भावासाठी आपल्या जमिनीतील सहावा हिस्सा भूदान म्हणून समाजासाठी द्यावा अशी विनोबा भावेंनी विनंती केली.

"'दानं संमविभाग:' दान म्हणजे समाजात सविभाजन" (भावे विनोबा (१९८९)१०). अशी दानाची व्याख्या शास्त्रकारांनी केली आहे. या व्याख्येचे समर्थन आपल्याला एका कुटुंबात केलेले दिसून येत ते म्हणजे, आई वडील हे आपल्याला कितीही मूले असली तरी प्रत्येकाला आपल्या जमिनीतील समान हिस्सा देतात. त्या प्रमाणेच समाजातील प्रत्येक गरीबांना, भूमीहिनांना दिला पाहिजे. जसा घरच्या मुलाचा जमिनीवर हक्क असतो तसा भूमीहिनांचाही जमिनीवर हक्क असायला हवा. म्हणून भूदान यज्ञात प्रत्येकाने भाग घेतलाच पाहिजे. भूमीदानात प्रत्येकास हिस्सा मिळालाच पाहिजे. तेव्हाच समाजात कोणही भूमीहीन राहणार नाही. असे भूदानाविषयी विनोबांचे विचार होते.

विनोबा भावेंनी भूदान यज्ञातूनच अनेक 'दान' या शब्दाच्या संकल्पना मांडल्या आहेत. त्यातूनच भूदान यज्ञाबरोबर संपत्तीदानाचाही यज्ञ त्यांनी सुरू केला. भूदान यज्ञाचा हेतू सफल करण्यासाठी संपत्तीदान घेणे आवश्यक होते. संपत्तीदानामध्ये प्रत्येकाने आपल्या वार्षिक उत्पन्नातील सहावा भाग संपत्तीदान म्हणून द्यावा असे विनोबांनी सांगितले. त्यामुळे व्यक्तीची संपत्ती ही केवळ त्याच्या स्वत:च्याच नव्हे तर समाजाच्या उपयोगातही येईल. संपत्तीदानामुळे समाजात साधनसंपत्तीचे केंद्रीकरण होणार नाही. अस्तित्त्वात असणाऱ्या साधनसंपत्तीवर संपूर्ण समाजाचा हक्क राहील. भूदान यज्ञाचा मार्ग सफल होण्यासाठी संपत्तीदान ही सुरू झाले पाहिजे. ज्याच्याजवळ संपत्ती नाही, जमीन नाही तोही यज्ञाच्या कार्यात सहभागी होवू शकतो. विनोबा भावेंची दानाची शक्ती ही कधीच विखंडित होणारी नाही. दानाच्या यज्ञात त्यांनी श्रमदान, प्रेमदान, बुद्धीदान आणि जीवनदान यांचा अंर्तभाव केला होता. जमिनीच्या दानाच्या प्रक्रियेतून सुरू झालेली ही

दानाची प्रक्रिया जीवनाचे सर्वच क्षेत्रात पादाक्रांत करत जाईल. आणि ती यशस्वीतेच्या मार्गाने वाटचाल करेल. असा विनोबांना विश्वास होता. त्यांच्या मते, "भूदान यज्ञाचा संकल्प यशस्वी करायचा असेल तर त्याच्यावरच सर्व लक्ष केंद्रित करून आत्मसमर्पण करणे जरूरीचे आहे. कार्यकर्त्यांनी भूदान यज्ञ हा सर्वधर्म आहे असे मानून त्यात अनन्यभावे आत्मसमर्पण करावे." (भंडारी चारूदत्त (१९५६)२०१). असे भूदान, संपत्तीदान या विषयी विवेचन केले आहे.

भूदान चळवळीचा शेवटचा प्रवास हा ग्रामदानाच्या दिशेने चालू होतो. गाव हे एक कुटुंब आहे. असे माणून आदर्श कुटुंबाप्रमाणे गावाचा कारभार केला पाहिजे. त्याबद्दल विनोबा म्हणतात "प्रत्येक गाव गोकुळ बनावे, गावाची सारी जमीन सर्वांची बनावी आणि सर्वांनी वाटून घ्यावी." (भावे विनोबा (१९५८)९). असा ग्रामदानाचा आदर्श त्यांनी समाजासमोर ठेवला. ग्रामदानामुळे व्यक्तिगत मालकी नष्ट होते. आणि समाजाची सामूहिक मालकी निर्माण होते. ग्रामोद्योगावर ग्रामदानाचा भर असल्यामुळे गाव स्वयंपूर्ण होते. त्यामुळे समाजहिताच्या सर्व कामांची सामाजिक, नैतिक आणि आध्यात्मिक प्रतिष्ठा समान होईल अशा पद्धतीने गावाचा आदर्श ग्रामपरिवार तयार होईल. असा विश्वास विनोबा भावेंना वाटत होता. त्यांनी असा भूदानापासून ग्रामदानापर्यंतचा प्रवास केला आहे. साम्यवादी तत्त्वामधील 'कुवतीप्रमाणे काम व गरजेनुसार दान' या तत्त्वाचा ग्रामदानात उपयोग केला होता. म्हणून विनोबांची साम्यवाद व साम्ययोगाची संकल्पना अभ्यासने गरजेचे आहे.

**ब ) साम्यवाद आणि साम्ययोग :**

मार्क्सने भांडवालशाही समाजव्यवस्थेला निपटून काढण्यासाठी सम्यवादाचा सिद्धांत मांडला. समाजातील आर्थिक विषमता, भेदभाव नष्ट करून एकसंघ समाजाची स्थापना मार्क्सला करायची होती. साम्यवादात संपूर्ण समाजाच्या विकासाचा विचार न करता फक्त कामगार वर्गाच्या विकासाचा विचार केला होता. कामगार वर्गावर

भांडवलशाहीकडून होणाऱ्या अन्यायाचे निराकरण करण्याचा संकुचित दृष्टिकोन साम्यवादाचा होता. त्यामध्ये हिंसा, संघर्ष या मार्गाचा स्वीकार केला होता म्हणून विनोबा भावे यांनी साम्यवादावर पुढील आक्षेप घेतले आहेत.

१) "वैतर्किक वस्तूवादातून मार्क्सने काढलेले निष्कर्ष निष्पन्न होतात असे नाही.

२) साम्यवादाची वर्ग संघर्षाची कल्पना चुकीची आहे.

३) मत्सर, द्वेष, प्रतिक्रिया यांच्या आधारावर स्थायी व श्रेयस्कर परिवर्तन होवू शकत नाही.

४) भांडवलशाहीतील केंद्रीकरण, यंत्रपूजा, शस्त्रनिष्ठा व शोषण यापैकी तिन्ही गोष्टी कायम राखून चौथी नाहीशी करण्याचा प्रयत्न समाजवादाने केला. तो अशास्त्रीय होता. म्हणून तो फसणे क्रमप्राप्त होतो.

५) साम्यवादात करूणा आहे. पण वैज्ञानिक चिंतन नाही. परिवर्तनाची प्रक्रिया एकांगी आहे.

६) साम्यवादात साध्य-साधन विवेक नाही. हिंसेवर तो भरवसा ठेवत आला आहे. ती श्रद्धा ढळली असली तरी अजून हिंसेला पर्याय सापडलेला नाही.

७) व्यक्तिगत त्याग प्रयत्नावर साम्यवादाचा विकास नाही.

८) युरोपातील परिस्थितीच्या आधारावर बनलेले त्याचे सिद्धांत भारतात प्रासंगिक नाहीत.

९) तो भविष्य सत्ययुगवादी आहे. आदर्शाच्या दिशेने पावले टाकण्याऐवजी तो उलटी दिशा पकडतो." (भावे विनोबा (१९९०)७).

अशा टिका केल्या आहेत. या दोषामुळेच साम्यवाद यशस्वी होवू शकला नाही. साम्यवादात कामगार वर्गाच्या कल्याणाचा, विकासाचा विचार करण्यात आला आहे. त्यामुळे तो अपयशाकडे झुकलेला आहे असे वाटते. साम्यवादाने समाजपरिवर्तनासाठी हिंसेचा मार्ग स्वीकारला. परंतु हिंसेच्या मार्गाने होणाऱ्या परिवर्तनास समाजाकडून विरोध हा होतच असतो. अशा अनेक साम्यवादातील विचारांचे खंडन करून विनोबा भावेनी साम्ययोगाचा अहिंसक विचार मांडला.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

समाज विकासाच्या तत्त्वामध्ये दुसऱ्याच्या विकासात आपला विकास पाहणे या समग्र विकासाचा दृष्टिकोन आधारभूत माणून विनोबांनी साम्ययोगाची निर्मिती केली. त्यांनी भूदान यज्ञाच्या मूळ विचारधारेलाच 'साम्ययोग' हे नाव दिले. 'सर्वांभूती एक आत्मा' म्हणजे साम्ययोग होय. स्वत:ला सर्वांमध्ये व सर्वांना स्वत:मध्ये पाहण्याची दृष्टी आणि सुख-दु:खातही सर्वांबरोबर राहण्याची वृत्ती या विचारातून प्रकट होते. असा साम्ययोगाचा व्यापक विचार आहे. साम्ययोगात समाजातील आर्थिक, राजकीय, सामाजिक, नैतिक क्षेत्रात संभवणाऱ्या प्रश्नांचे निराकरण करून विकासाकडे वाटचाल करणे शक्य होते. साम्ययोगात हृदय-परिवर्तनावर भर देण्यात आला आहे. परंतु परिवर्तनाची सुरूवात प्रत्येकाने स्वत:पासून करायची असते. विनोबांची सर्वोदय समाजाची संकल्पना साम्ययोगाच्या मजबूत पायावर उभारलेली आहे. त्यांनी शासनविरहित समाजाच्या निर्मितीसाठी अहिंसक क्रांतीचा विचार साम्ययोगामार्फत मांडला होता. साम्ययोगात 'सर्वायतन'ची सत्ता प्रस्थापित करायची होती. तेथे कोणत्याही सक्तीचा, दंडाचा वापर करावा लागत नव्हता. त्यामुळे समाजात बाह्य सामाजिक परिवर्तनाला अंतरिक मानवी मनाच्या परिवर्तनाची जोड मिळाली होती. हा साम्ययोगाचा विचार एका गावापूरता, देशापूरता मर्यादित नसून तो एक विश्वव्यापी समाज निर्माण करील असा विनोबांना विश्वास वाटत होता. असा साम्ययोगाबद्दल त्यांचा विचार होता. विनोबा भावेंच्या साम्ययोगाच्या विचाराबरोबरच लोकनीतीच्या विचारांनाही महत्त्वाचे स्थान आहे.

**क ) लोकनीती :**

मो. क. गांधीनी सर्वकल्याणकारी समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी लोक-जागरण, लोक-शक्ती, लोक-नीती ही तीन साधने सांगितली आहेत. याद्वारे सर्वोदय समाजाची रचना करण्याचे उद्दिष्ट होते. या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी विनोबा भावे यांनी नवसमाज रचनेसाठी लोकांच्यात जागृती निर्माण करून कोणत्याही दंडशक्तीचा अवलंब न करता जनशक्ती एकत्रित करून संपूर्ण समाजाच्या मतानुसार चालणारी नीती म्हणजे लोकनीती. लोकनीतीचा वापर करून सर्वोदयाची स्थापना करण्याचा प्रयत्न केला.

राजनीतीत शासनसंस्था सत्तेच्या हव्यासापोटी चालत असते. त्यामुळे समाजातील इतर संस्थापेक्षा ती अधिक शक्तीशाली असते. राजनीतीत सत्ता मिळवण्यासाठी आणि ती टिकवून धरण्यासाठी दंडशक्तीचा, हिंसेचा वापर केला जातो. त्यामुळे तेथे व्यक्तिस्वातंत्र्याचा संकोच होतो. त्यामुळे व्यक्तीविकास व समाजविकास होत नाही. अशा राजनीतीला निपटून काढण्यासाठी सर्वांगीण विकासाचा दृष्टिकोन असणाऱ्या लोकनीतीची स्थापन करण्याचा विनोबांचा प्रयत्न होता. ते म्हणतात, "दंडशक्तीपासून फार दूर असणारी आणि समाजाच्या कल्याणासाठी, विकासासाठी अहिंसक शातंतेच्या मार्गाने प्रकट होणारी लोकनीती आवश्यक आहे." (भावे विनोबा, (१९९९)९५). अशी लोकनीती त्यांना अभिप्रेत होती. दंडशक्तीपासून वेगळी असणारी जनशक्ती समाजाच्या विकासासाठी आवश्यक असणारी तिसरी शक्ती आहे असा विनोबांचा विचार होता. म्हणून जीर्ण झालेल्या राजनीतीच्या जागी जनतेला सर्वश्रेष्ठ स्थान असणाऱ्या लोकनीतीची स्थापना त्यांना करायची होती.

विनोबा भावेंची लोकनीती म्हणजे 'जनतेची नीती' होय. प्रचलित राजनीतीपासून वेगळ्या जनतेच्या राजनीतीस त्यांनी लोकनीती म्हटले आहे. लोकनीतीमध्ये जनतेचे शासन असते. राज्यकर्त्यांच्या ठिकाणी केंद्रित झालेली राजनीती ही लोकनीतीमध्ये जनतेच्या ठिकाणी विविध स्तरावर विकेंद्रित होते. लोकनीतीमधील जनतेचे शासन हे प्रेम, दया, करूणा, समानता, बंधुत्त्व, स्वातंत्र्य यांच्या पायावर आधारित असते. म्हणून अशा सर्वांच्या पायावर उभ्या असणाऱ्या राज्यास विनोबांनी स्वराज्य, लोकनीती असे संबोधले आहे. येथे जनतेच्या हातात राज्यकारभार असल्याने सर्वांची सत्ता असणारा सर्वोदय समाज निर्माण होईल असे विनोबांना वाटत होते. प्रातिनिधिक लोकशाहीच्या बदल्यात प्रत्यक्ष लोकशाही स्थापन होईल. ती जनतेच्या संविधानानुसार चालणारी शासनसंस्था असेल. लोकनीतीमध्ये शासनसंस्थेचे स्थान हे स्व-अनुशासन आणि आत्मसंयमी होते. देशाच्या सर्वांगीण विकासासाठी संपूर्ण राज्यकारभार लोकनीतीद्वारे पार पाडण्यासाठी



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

राजनीती, विज्ञान, आध्यात्म यांचा विशिष्ट मेळ घालून जनतेला स्वावलंबी आणि स्वयंपूर्ण बनलवले पाहिजे. असा लोकनीतीविषयी विनोबा भावेंचा विचार होता. याच बरोबर त्यांनी अहिंसक क्रांतीचा जो विचार मांडला आहे त्यालाही अधिक महत्त्वाचे स्थान आहे.

**ड ) अहिंसक क्रांती :**

साम्यवादी विचारवंत मार्क्स याच्या विचारातून क्रांतीचा जन्म झाला. मार्क्सची क्रांती कम्युनिस्ट क्रांती होती. या क्रांतीचा केंद्रिय घटक कारखान्यातील कामगारवर्ग होता. तेथे संपूर्ण समाजाचा समावेश नव्हता. मो. क. गांधींनी मार्क्सच्या क्रांतीचा मार्ग अनुसरला असल तरी गांधीना अहिंसक क्रांती अभिप्रेत होती. त्यांना हिंसा मान्य नव्हती. हिंसेशिवाय क्रांती होवू शकते हा विचार ग्राह्य धरून गांधीप्रमाणे विनोबांनी भूदान आंदोलनाद्वारे अहिंसक क्रांतीचा विचार समाजापुढे मांडला. रक्ताचा थेंबही न सांडता लाखो एकर जमीन अहिंसेच्या मार्गाने भूदानासाठी मिळविली होती. भूदान आंदोलनाच्या अहिंसक क्रांतीशिवाय समाजाचे कल्याण होणार नाही असे विनोबांचे मत होते. ते म्हणतात, "माझा हेतू क्रांती टाळण्याचा नाही. मी हिंसक क्रांतीपासून देशाला वाचवू इच्छितो आणि अहिंसक क्रांती आणू इच्छितो." (भावे विनोबा (१९५७)६६). हिंसक क्रांतीपासून समाजाला वाचवण्यासाठी अहिंसक क्रांतीचा मार्ग त्यांना योग्य वाटत होता. कारण त्यांना नवीन समाजाची निर्मिती करायची होती. विनोबांच्या मते, "विश्वाची निर्मिती करण्यासाठी आवश्यक शक्ती भूदान आंदोलनात आहे. गांधी विचारधारा आणि समाजवादी विचारधारा यांच्या गंगा यमुनाच्या पवित्र भूदानामुळे त्या भारतात घडून येणार आहेत. सध्याच्या हिंसेच्या अंधकारमय वातावरणात भूदान आंदोलनाची अहिंसक क्रांती हा घटक आशेचा किरण आहे." (पाटगावकर चंद्रकांत (१९७७)२३३). असा विचार भूदानाच्या अहिंसक क्रांतीसाठी विनोबा भावे यांनी केला.

अशाप्रकारे विनोबा भावेंनी सर्वोदय संकल्पनेचा विकास करून तो विचार समाजात रूजवण्याचा प्रयत्न केला. याच विचाराने प्रभावित होवून जयप्रकाश नारायण यांनी सर्वोदयाच्या महाकुंडात उडी घेतली.

**जयप्रकाश नारायण यांच्या दृष्टितील सर्वोदय विचार :**

राज्यसत्तेच्या मोहापासून दूर राहून मो. क. गांधींच्या ध्येयपूर्तीसाठी कार्य करणारे समाजवादी नेते म्हणजे जयप्रकाश नारायण होय. जयप्रकाश नारायण हे विनोबा भावेंच्या विचारांकडे अधिक आकर्षित झाले होते. 'सत्तेची लालसा' असणारे राजकारण सोडून सर्वोदयाकडे येणारा महान नेता म्हणून विनोबानी जयप्रकाश नारायण यांचा जयजयकार केला होता. जयप्रकाश नारायण प्रथम मार्क्सवादी नंतर समाजवादी आणि त्यानंतर सर्वोदय अशी त्यांची विचारप्रणाली वाटचाल करत होती. त्यामुळे त्यांच्यावर पलायनवादी असल्याचा आरोप केला होता. पण "नीतीपासून राजनीतीचा त्याग करणारा म्हणून जयप्रकाश नारायण यांचे नाव भारताच्या इतिहासात अढळ राहीले" (प्रधान, ग. प्र. (२००१)५६). पहिल्या सार्वजनिक निवडणूकीच्या पराभवानंतर जयप्रकाशांची विचारप्रणाली समाजवादाकडून सर्वोदयाकडे ओढ घेवू लागली. तसे जयप्रकाश नारायण यांनी राजकारण सोडले आणि सर्वोदयात स्वत:ला झोकून घेतले. जयप्रकाश नारायण यांनी आपल्या समाजवादातील सहकाऱ्यांनी सर्वोदयाकडे यावे यासाठी 'सर्वोदयाकडे' असे एक पत्र पाठविले होते. त्यांनी, "'समाजवादाकडून सर्वोदयाकडे' या मथळयाच्या प्रदिर्घ लेखात सर्वोदयाकडे जाणारा विचारप्रवाह मांडला आहे." (भारतीय समाज विज्ञान कोष, खंड ४, पृ. ५०४). सर्वोदय हा समाजपरिवर्तनाचा मार्ग आहे. परंतु समाजवाद जोपर्यंत परिर्वतीत होत नाही. तोपर्यंत सर्वोदयाचे ध्येय मानवाला असाध्य राहतील. यासाठी समाजवाद सर्वोदयात परिर्वतीत होणे गरजेचे आहे. अशी जयप्रकाश नारायण यांची अपेक्षा होती.

जयप्रकाश नारायण यांच्या मते, "समाजवाद व साम्यवाद यांच्या जडवादी तत्त्वज्ञानामुळे कला, धर्म, तत्त्वज्ञान, विज्ञान व राजकारण या सर्व प्रवृत्ती भौतिकवादाच्या महापूरात बुडून जातात. त्यामुळे मानवी जीवनात शांतता आणि समतोल राहत नाही." (भारतीय समाज विज्ञान कोष, खंड ४, पृ. ५०४). प्रत्येकाने आपल्या गरजा कमीत-कमी करून जडवादी तत्त्वज्ञानाचा वापर कमी केला पाहिजे. आहे त्यातच गरजा

भागवण्याचा प्रयत्न केल्यास समाजात शांतता आणि समतोल निर्माण होईल. समाज परिवर्तनाच्या कार्यात स्वत:च्या जबाबदारीची जाणीव ठेवून सहभागी झाले पाहिजे. समाजात अस्तित्त्वात असलेली सर्व सामाजिक तत्त्वे व पद्धतीपेक्षा सर्वोदय तत्त्वज्ञान हे सर्वांच्या पुढचे पाऊल टाकते. जर कधी काळी शांतता, स्वातंत्र्य यांच्या संकेतस्थळी पोचायचे असेल तर त्या प्रीत्यर्थ समाजवादाला सर्वोदयात विसर्जीत व्हावे लागेल. शांतता स्वातंत्र्य प्राप्त करण्यासाठी सर्वोदयाचा मार्ग योग्य आहे असे जयप्रकाश नारायण यांचे विचार होते. जयप्रकाश नारायण म्हणतात, "या विश्वाला जर शांती, स्वातंत्र्य आणि मातृत्त्वा पर्यंत पोहचायचे असल्यास समाजवादास सर्वोदयात विलिन झालेच पाहिजे." (रघुवंश (१९७८)२६). असा समाजवादातून सर्वोदयाकडे जाण्याचा विचार त्यांनी मांडला आहे.

सर्वोदयाच्या कार्यासाठी जयप्रकाश नारायण यांनी आपले जीवनदान घोषित केले. सर्वोदय तत्त्वज्ञानाच्या प्रसारासाठी १९५८ मध्ये पत्नी प्रभावती आणि सिद्धराज ढड्ढा यांना बरोबर घेऊन जयप्रकाश नारायण यांनी साडेचार महिने युरोपचा दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी सर्वोदयाच्या प्रसारासाठी पन्नासहून जास्त भाषणे दिली. तो दौरा म्हणजे सर्वोदय विचार जगात रूजवण्याचा प्रयत्न होता. इतर विचार प्रणाली पेक्षा सर्वोदय विचारप्रणाली कशी वेगळी आहे हे पटवून देण्याचे कार्य जयप्रकाश नारायण यांनी केले.

सर्वोदय विचार स्वीकारताना जयप्रकाश नारायण यांनी गांधीवादावर एक दृष्टी टाकली होती. म्हणूनच जयप्रकाश नारायण म्हणतात, "मानवाच्या कल्याणाच्या रस्त्यावर अविरत प्रवास करत मी सर्वोदयाच्या या पायरी पर्यंत पोहचू शकलो. स्वतंत्रता, बंधुता आणि समानता यांची ज्योत आजपर्यंत माझी वाट बघत होती. ही ज्योत आज मला सर्वोदयात घेऊन आली आहे." (लाल लक्ष्मीनारायण (१९७५)२१३). स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तत्त्वाजवळ जाण्याचा मार्ग जयप्रकाश नारायण यांना सर्वोदय तत्त्वज्ञानाने दाखविला. त्यामुळे सर्वोदयाचा मार्गच खराखुरा समाजवाद आहे. आणि सर्वोदय हे लोकशाही समाजवादाचे विकसित रूप आहे असे जयप्रकाश नारायण मानतात.

जयप्रकाश नारायण यांनी लोकशाहीचा स्वीकार करताना खेड्याकडे अधिक लक्ष दिले. त्यांनी ग्रामशासनाचा उल्लेखही सर्वोदयात केला आहे. तेव्हाच यांनी सर्वोदयाचा एक कार्यक्रम सांगितला तो म्हणजे प्रत्येक गावात ग्रामसभेची स्थापना करणे. गावाचा स्वतंत्र असा आर्थिक कोष निर्माण करणे, गावासाठी प्रसंगी प्राण पणाला लावणाऱ्या शांतीसैनिकांची व शांतीसेनेची स्थापन करणे. हा सर्वोदयाच्या यशाचा कार्यक्रम त्यांनी सांगितला आहे. यानुसारच जयप्रकाश नारायण यांना सर्वोदय समाजाची रचना अभिप्रेत होती.

जयप्रकाश नारायण यांनी सर्वोदयाच्या माध्यमातून भूदान चळवळीत सहभाग घेतला होता. भूमीहिन धरतीमातेचे सुपूत्र आहेत. ते जमिनधारकांचे भाऊ आहेत. म्हणून प्रत्येक जमीन धारकाने आपल्या भूमीहिन भावांसाठी आपल्या जमिनीतला काही हिस्सा दान म्हणून द्यावा हे विनोबा भावेंचे समाजाला केलेले आवाहन ऐकून जयप्रकाश नारायण सर्वोदयाकडे आकर्षित झाले होते. १९५२ च्या उत्तरप्रदेश बांदा येथील सभेत जयप्रकाश नारायण भूदान विषयक विचार स्पष्ट केले आहेत. नवीन विश्व निर्माण करण्याची शक्ती भूदान आंदोलनात आहे. सर्वोदयाच्या विचारानुसार भूदान आंदोलन चालू झाले असल्याने भूदान आंदोलनातून नवीन समाजाची निर्मिती होवू शकते. त्यानंतर 'बोधगया' येथील संमेलनात जयप्रकाश नारायण यांनी भूदानाच्या यंत्रमूलक अहिसंक क्रांतीसाठी माझे जीवनदान मी करत आहे असे घोषित केले. अशा या जीवनदान करणाऱ्या जयप्रकाश नारायनांनी सर्वोदयास एक विश्वव्यापी स्वरूप प्रदान केले होते. त्यामुळे सर्वोदयातील जयप्रकाश नारायण यांचे कार्य मोलाचे आहे. या कार्यकर्त्यां बरोबरच धिरेंद्र मुजुमदार यांनीही सर्वोदय तत्त्वज्ञान समाजात रूजवण्याचा प्रयत्न केला आहे.

**धिरेंद्र मुजुमदार यांच्या दृष्टितील सर्वोदय विचार :**

सर्वोदय विचारांना आणि कृतीला प्रत्यक्ष योगदान देणारी आणखी एक व्यक्ती म्हणजे, धिरेंद्र मुजुमदार होय. मो. क. गांधी आणि विनोबा भावे यांच्या सर्वोदय विचारधारेला प्रत्यक्षात उतरवण्याचा प्रयत्न धिरेंद्र मुजुमदारांनी केला. त्यांच्या मते, प्रेम

आणि भक्ती म्हणजे सर्वोदय होय. माणूस परमेश्वराची भक्ती, सेवा जशी मनापासून करतो तशीच भक्ती, सेवा, प्रेम हे समाजासाठी केली पाहिजे. प्रत्येकाने इतरांची मानवतेच्या नात्याने सेवा करणे गरजेचे आहे. सर्वांच्या सहकार्यातून समाजाच्या विकासास हातभार लागतो. तेव्हाच सर्वोदय समाजाच्या स्थापणेसाठी अनुकुल वातावरण तयार होईल. असे धिरेंद्र मुजुमदारांचे मत होते. ते म्हणतात, "गावा-गावामध्ये ग्रामराज्य स्थापन केले पाहिजे. जर आपण नोकरशाहीच्या भरवशावर राहिलो तर आपल्या जवळ जे काही आहे ते संपूर्ण समाप्त होईल." (मुजुमदार धिरेंद्र (२००१)३३७). खेड्याचा उदय व विकास होणे धिरेंद्र मुजुमदारांना अभिप्रेत होते. ग्रामराज्य स्थापण करण्यासाठी नोकरशाहीला विरोध केला पाहिजे. याचप्रमाणे धिरेंद्र मुजुमदार ग्रामराज्याचा विचार मांडताना गाव पातळीपर्यंत सत्तेचे विकेंद्रीकरण होण्याच्या तत्त्वावर, पद्धतीवर भर देतात.

मो. क. गांधीच्या विचारा प्रमाणेच धिरेंद्र मुजुमदारांचा लोकतंत्राचा विचार आहे. त्यांना प्रत्यक्ष जनशक्ती निर्माण करून लोकतंत्राची चांगली शक्ती स्थापन करावी अशी इच्छा होती. त्यांनी जनशक्तीला महत्त्व दिले आहे. दंडशक्तीचा वापर न करता जनतेच्या लोकतंत्राची निर्मिती त्यांना करायची होती. सर्वोदय समाजासाठी जनतेच्या आधारावर उभी राहिलेल्या जनतंत्राची आवश्यकता होती. याचबरोबर देशाच्या अर्थनीतीचाही विचार मांडला आहे. स्वदेशी भांडवलीशाही आणि विदेशी भांडवलशाही मार्फत नोकरशाही आणि त्यांनी निर्माण केलेले दलाल आपल्या देशक्तांना विकत घेतील आणि चर्तुभूजा असलेला समाज निर्माण होईल. तो समाज स्वार्थी असल्याने समाजातील इतर लोकांचा उदय होणार नाही. तेव्हा समाजाच्या विकासासाठी त्यांची सत्ता नाहीशी करून समाजाची सत्ता स्थापन करणे गरजेचे आहे. कारण त्यातूनच सर्वोदयी समाज निर्माण होवू शकतो असा त्यांना विश्वास वाटत होता.

धिरेंद्र मुजुमदारांनी विनोबा भावेंच्या भूदान यज्ञाच्या कार्यात सहभाग घेवून भूमीहिनांना जमिनी मिळवून देण्यासाठी प्रयत्न केला. "समाजात असणारी ईर्ष्या, द्वेष,

स्वार्थ, भ्रष्टाचार आणि अनेक प्रकारच्या अनैतिक घटकांना नष्ट करून नैतिक आंदोलनाचे स्वागत लोक करू लागले." (मुजुमदार धिरेंद्र (२००१)४८३). असे धिरेंद्र मुजुमदार म्हणतात. त्यामुळे भारतातील जास्तीत जास्त लोक भूदानाकडे आकर्षित झाले होते. भूदान आंदोलनाला नैतिकतेचे स्वरूप देवून समाजातील अनैतिकतेला बाजूला सारण्याचा प्रयत्न समाजानेच केला होता. १९५२ च्या बोधगया येथील संमेलनात धिरेंद्र मुजुमदारांना जयप्रकाश नारायण यांच्याकडून जीवनादाचा स्त्रोत मिळाला त्यामुळे त्यांनी संपूर्ण जीवन सर्वोदय समाजासाठी व्यतीत केले होते. आणि सर्वोदय, भूदान, ग्रामदान, जीवनदान आणि अध्यात्म या मार्गाने प्रवास सुरू केला. अशा प्रकारे मो. क. गांधींच्या सर्वोदय तत्त्वज्ञानाला अनेक विचारवंतांच्या विचारातून विकास होत गेला.

**सर्वोदयाचा विकास :**

मो. क. गांधींनी सर्वोदयाचा विचार प्रथम मांडला. त्या विचारनुसार नवसमाजरचना करण्याचा त्यांचा प्रयत्न होता पण त्यांना ते शक्य झाले नाही. स्पर्धा, विषमता, हिंसा, वर्ग नष्ट करून शासनमुक्त समाज स्थापन करण्याचे त्यांचे स्वप्न राहून गेले. त्यांच्या मृत्यूनंतर गांधी विचारांना एक संघटनात्मक स्वरूप प्रदान करण्याचा प्रयत्न गांधीवादी कार्यकर्त्यांनी करण्याचा प्रयत्न केला. आणि सर्वोदय विचाराच्या कार्याची सुरूवात झाली. सर्वोदयाच्या प्रसारासाठी संमेलने, पदयात्रा, मेळावे यासारखे कार्यक्रम आयोजित करून सर्वोदयाच्या विचारांना प्रत्यक्ष कार्याची जोड देण्यात आली. यामध्ये विनोबा भावे अग्रस्थानी होते. भूदान आंदोलनाने गांधीच्या सर्वोदय विचाराचा तुटलेला धागा पुन्हा जोडण्याचा प्रयत्न केला. विनोबांनी भूदानाबरोबरच ग्रामदान, श्रमदान, प्रेमदान, सुतांजलीदान व शांतीसेना असे कार्यक्रम चालू केले. सर्वोदय समाजासाठी प्रसंगी हिंसेचा वापर झाल्यास प्राणपणाला लावणारे शांतीसैनिक निर्माण करण्याचा प्रयत्न विनोबांनी केला होता. त्यांनी सर्वोदयाच्या प्रसारासाठी आपले संपूर्ण जीवन पणाला लावले होते. विनोबा भावेंनी उच्चारलेल्या "जय ग्रामदान जय-जगत" (अग्रवाल गंगाप्रसाद (२००३)२६). या सर्वोदयाच्या विचारधारेने संपूर्ण जग व्यापले होते.

सर्वोदय मासिकाच्या संपादनाची भूमिका बजावणारे गांधीवादी कार्यकर्ते म्हणजे दादा धर्माधिकारी यांनी सर्वोदयाचा विचार समाजातील सर्व स्तरापर्यंत पोहचवण्यासाठी 'सर्वोदय' मासिकातून सुरूवात केली. त्यानंतर व्याख्याने, भाषणे देवून सर्वोदयाचा विचार समाजात पोहचवला. अशाप्रकारे दादा धर्माधिकारी यांनी सर्वोदयाच्या प्रसारासाठी सर्वोदय मासिकातून आपल्या लेखणीला आणि व्याख्यानामधून आपल्या वाणीला प्रवासाचा (प्रचाराचा) मार्ग मोकळा करून दिला. विनोबा भावे प्रमाणेच दादांनी सर्वोदयाच्या कार्याची यशस्वीरित्या महत्त्वाची भूमिका बजावली होती. अशाप्रकारे सर्वोदय विचारांचा विकास होत गेला.

जयप्रकाश नारायण यांनी सर्वोदयाच्या प्रसारासाठी १९५८ मध्ये साडेचार महिने विदेश दौरा केला होता. जयप्रकाश नारायणांच्या या दौऱ्याने सर्वोदयास विश्वव्यापक स्वरूप प्राप्त झाले होते. तसेच त्यांनी विनोबांच्या भूदान यज्ञासाठी आपले संपूर्ण जीवनदान घोषित केले होते. धिरेंद्र मुजुमदारांनी मो. क. गांधी यांच्या सर्वोदयाच्या विचारास प्रत्यक्ष व्यवहारात उतरवण्याचा अथक प्रयत्न केला होता. अशाप्रकारे अनेक गांधीवादी विचारवंतानी आणि कार्यकर्त्यांनी सर्वोदयाच्या यशस्वीतेसाठी आप-आपल्या परीने प्रयत्न केले होते.

सर्वोदयात भूदान, ग्रामदान, जिल्हादान यातूनच 'बिहारदाना'ची कल्पना पुढे आली. तेव्हा सर्वोदयाच्या विचारांना फार गती होती. परंतु त्यानंतरच काही दिवसातच सर्वोदयाच्या विचारांना उतरती कळा आली. त्यावेळी विनोबा भावेंनी पदयात्रा थांबवली. जयप्रकाश नारायण यांच्या समग्र क्रांतीच्या विचाराने सर्वोदयात फूट पडली. परिणामी सर्वोदय विचारांचा प्रवाह हळूहळू कमी होत गेला. परंतु सर्वोदयी कार्यकर्त्यांनी सर्वोदयाच्या विकासाचे आजही अनेक कार्यक्रम चालू ठेवले आहेत.

सर्वोदयाचे तत्त्वज्ञान भारतीय परंपरेला खूपच महत्त्वाचे आहेत. ते उच्च आणि उदात्त सांस्कृतिक मूल्यांवर आधारलेले आहेत. भारतीय जीवनमार्गात अंतर्भूत असणाऱ्या परंपरा सर्वोदयाने अधोरेखित केल्या आहेत. कुटुंबांचा विस्तार म्हणजे समाज ही कल्पना सर्वोदयाने पुन्हा उचलून धरली आहे. हा सर्वोदयाचा दृष्टिकोन उदात्त आणि प्रेरणादायी

16101

आहे. सर्वोदयात प्रत्येक माणूस समाजाच्या कल्याणासाठी नवीन विचार घेऊन पुढे येतो आहे. भारतातील सर्वोदय सेवक आजही खादी, ग्रामोद्योग, गोसेवा यासारखे अनेक प्रयोग पुढे आणतो आहे. तसेच सर्वोदय विचार सत्य, अहिंसा हा दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून साठ वर्षे वाटचाल करत आला आहे. आजही सर्वोदय विचाराची समाजास गरज असल्याने सर्वोदयाचे तत्त्वज्ञान समाजात रूजवण्याचा प्रयत्न होत आहे. यास जनतेचाही तसा सहभाग मिळत आहे. अशाप्रकारे सर्वोदयाचा आजपर्यंत विकास होत आला आहे.

**सर्वोदयाची उद्दिष्ट्ये :**

१) शासनमुक्त समाजाची निर्मिती करणे.

२) स्पर्धा, विषमता, संघर्ष, हिंसा नसणारी नवसमाज रचना निर्माण करणे.

३) वरिष्ठापासून कनिष्ठांपर्यंत सर्वांचा विकास करणे.

४) समाजात मानवतेचा अद्वैतभाव निर्माण करणे.

५) स्वयंशासित स्वायत्त समाजाची निर्मिती करणे.

६) इतरांच्या सुखात आपले सुख मानने.

७) समाजात स्वातंत्र्य, समता, बंधुत्व निर्माण करणे.

८) मानवी विकासाला पोषक वातावरण तयार करणे.

९) कोणताही निर्णय सह-विचाराने करणे.

१०) सत्तेचे विकेंद्रिकरण करणे.

११) सर्वांच्या सुखासाठी प्रयत्न करणे.

१२) समाजातील आर्थिक विषमता नष्ट करणे.

१३) हिंसेला समाजात थारा न देणे.

१४) अहिंसेचे तत्त्व समाजात रूजवणे.

या उद्दिष्ट्यांच्या पूर्ततेसाठी मो. क. गांधीनी सर्वोदयाची संकल्पना मांडली व त्याचा उत्तरगांधीवाद्यांनी विकास केला. यामध्ये दादा धर्माधिकाऱ्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. म्हणून दादा धर्माधिकारी यांच्या सर्वोदय कार्यप्रणालीचा अभ्यास करणे गरजेचे आहे. पुढील प्रकरणात दादांच्या सर्वोदय विचारांचा दृष्टिकोन अभ्यासण्यात येणार आहे.

## संदर्भ ग्रंथ सूची


१) अग्रवाल गंगाप्रसाद : (२००८), 'साम्ययोग साधना : नव्या युगाच्या निर्मितीच्या दिशा', सर्वसेवा संघ प्रकाशन, वाराणसी.

२) भावे विनोबा : (१९८९), 'सर्वोदय विचार आणि स्वराज्यशास्त्र', परंधाम प्रकाशन, पवनार.

३) भावे विनोबा : (१९८९), 'साम्ययोग समाजाचे चित्र', परंधाम प्रकाशन, पवनार.

४) भावे विनोबा : (१९९०), 'साम्यवाद की साम्ययोग', परंधाम, प्रकाशन, पवनार.

५) भावे विनोबा : (   ), 'ग्रामदान, ग्रामराज्य आणि शांती सेना', परंधाम विद्यापीठ प्रकाशन, वर्धा.

६) भावे विनोबा : (१९५७), 'भूदान की गंगा', परंधाम प्रकाशन, वर्धा.

७) भावे विनोबा : (१९९९), 'लोकनीती', सर्वसेवा संघ प्रकाशन, वाराणसी.

८) भंडारी चारूदत्त : (१९५६), 'भूदान यज्ञ : समग्र दर्शन', परंधाम प्रकाशन, वर्धा.

९) भारदे बाळासाहेब : (१९५७), 'विनोबा दर्शन', श्रीभारदे प्रकाशन, आंतर भारती मुद्रणालय.

१०) चौसाळकर अशोक : (२००३), 'महाराष्ट्रातील गांधीवादाचा विकास आणि अन्वयार्थ', शिवाजी विद्यापीठ प्रकाशन, कोल्हापूर.

११) धर्माधिकारी दादा : (१९८५), 'सर्वोदय दर्शन', परंधाम प्रकाशन, पवनार.

१२) धर्माधिकारी दादा : (१९८६), 'मनीषीची स्नेहगाथा', परंधाम प्रकाशन, पवनार.

१३) ढड्ढा सिद्धराज : (२००७), 'वैकल्पित समाज रचना', सर्व सेवा संघ प्रकाशन, वाराणसी.

१४) गांधी मोहनदास करमचंद : (१९५५), 'सर्वोदय का सिद्धांत', नवजीवन प्रकाशन, अहमदाबाद.

१५) गांधी मोहनदास करमचंद : (२००८), 'आत्मकथा', नवजीवन प्रकाशन, अहमदाबाद.

१६) खांडेकर श्री. वि. व नानेकर कृ. व. : (१९७०), 'विदर्भातील भूदान', नागपूर विद्यापीठ प्रकाशन.

१७) लाल लक्ष्मीनारायण : (१९७५), 'जयप्रकाश', दि मॅकमिलन कंपनी प्रकाशन, दिल्ली.

१८) मुजुमदार धिरेंद्र : (२००१), 'समग्र ग्रामसेवा की ओर', सर्वसेवा संघ प्रकाशन, वाराणसी.

१९) पाटगांवकर चंद्रकांत : (१९७७), 'प्रकाशयात्री जयप्रकाश', अजब पुस्तकालय प्रकाशन, कोल्हापूर.

२०) प्रधान ग. प. : (२००१), 'महान लोकनेता जयप्रकाश नारायण', साधना प्रकाशन.

२१) रघुवंश : (१९७८), 'जयप्रकाश नारायण के विचार', लोकभारती प्रकाशन.